# मिरा भाईंदर महानगर पालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेस नोट

- **MICL आरध्या हाई पार्क सोसायटी तर्फे मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्तांचा विशेष सत्कार**

मिरा भाईंदर महानगर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वीपणे राबवले जात आहेत. यापैकी एक महत्त्वाचा उपक्रम म्हणजे स्वच्छता ही सेवा या मोहिमेतर्गत आयोजित केलेली स्टार रँकिंग स्पर्धा, ज्यात सोसायटी गटात MICLआराध्या हाई पार्क सोसायटीने पहिला क्रमांक पटकावला होता.

या सोसायटीतील सर्व नागरिकांनी इतक्या सुंदर आणि नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर काटकर (भा.प्र.से.), प्रभाग 6 चे स्वच्छता निरीक्षक कांतीलाल बांगर, व प्रभाग 4 चे स्वच्छता निरीक्षक नितीन खैरे यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी आयुक्तांनी तुम्ही केलेला आमचा हा सत्कार म्हणजे मिरा भाईंदर महानगर पालिकेने राबविलेले विविध नाविन्यपूर्ण उपक्रम यशस्वी झाल्याची समाधानकारक पोच पावती आहे असे सांगितले.

MICL आराध्य हाई पार्क सोसायटीला महानगर पालिकेकडून प्रदान करण्यात आलेला 21 हजार रुपयांचा धनादेश सोसायटीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना देण्यात आला. या कर्मचाऱ्यांची मेहनत आणि उत्कृष्ट कामगिरीमुळे हा सत्कार त्यांच्यासाठीच योग्य असल्याची भावना सोसायटी सदस्यांनी व्यक्त केली.

या आनंदमय प्रसंगी आयुक्तांनी फराळ सखी या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन केले. MICL आराध्य हाई पार्क सोसायटीत या फराळ सखी उपक्रमातील फराळ आणि इतर पदार्थ चवीसाठी ठेवले होते.त्याचा आस्वाद आयुक्तांसह सोसायटीतील नागरिकांनी घेतला आणि मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या विशेष सहयोगाने महिला बचत गटाच्या कुशल महिलांनी राबविलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमातील फराळाचे कौतुक करून महिलांना भरभरून शुभेच्छा दिल्या.

मिरा भाईंदर महानगर पालिका आणि महिला बचत गट फेडरेशनच्यां माध्यमातून मिरा भाईंदर शहरातील महिलांनी सुरू केलेला फराळ सखी या नाविन्यपूर्ण उपक्रमात शेकडो महिला सहभागी झाल्या असून आपले कौशल्य वापरून अनेक चविष्ट पदार्थ आणि फराळ खास मिरा भाईंदर शहरातील नागरिकांसाठी विविध ठिकाणी स्टॉलच्यां माध्यमातून उपलब्ध होणार आहे. त्याचा लाभ समस्त मिरा भाईंदर मधील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन मनपा आयुक्तांनी केले आहे.